ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# भविष्यातील सेवांतर्गत शिक्षक प्रशिक्षण

**प्रा. अर्चना बाळासाहेब दांगट**

धारेश्वर शिक्षणशास्त्र महाविद्यालय धायरी

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना ः** शाळा ही शिक्षकांची कार्यभूमी असते. शिक्षकी पेशात कार्यरत असताना स्वतः विकसित आपल्या विद्यार्थ्यांच्या आचार विचारांना गती देत त्यांना प्रगत उन्नत बनविणे हे शिक्षकाचे परम कर्तव्य असते. आजच्या गतिमान युगात ज्ञानाचा स्फोट होत आहे. ज्ञान विज्ञानाच्या कक्षा सातत्याने रूंदावत आहेत. अशावेळी आपला विद्यार्थी गोंधळून न जाता तो ठामपणे व आत्मविश्वासाने उभा राहून स्वयंभू व्हावा यासाठी शिक्षकांनी चंग बांधायला हवा. नवे विचार स्विकारत प्रयोगशील उपक्रमशील व्हायला हवे. यासाठी सर्वोत्तम मार्ग म्हणजे सेवांतर्गत शिक्षक प्रशिक्षण होय. सेवेत असणा या शिक्षकांसाठी उदबोधन वर्ग उजळणी वर्ग उपचारात्मक वर्ग उन्हाळी वा हिवाळी अभ्यासक्रम या सर्वांचा समावेश सेवांतर्गत प्रशिक्षणात होत असतो. नोकरी संपेपर्यत अशा प्रकारचे शिक्षकांचे प्रशिक्षण सुरूच असते. नोकरी करीत असताना घेतलेले प्रशिक्षण असे देखील या सेवांतर्गत प्रशिक्षण असे संबोधण्यात येते.

१९८६ च्या नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षकप्रशिक्षण ही सातत्याने चालणार प्रकिया आहे. ज्याप्रमाणे सेवापूर्वक प्रशिक्षणाची गरज आहे. त्याचप्रमाणे सेवांतर्गत प्रशिक्षणाची गरज असते.

**अर्थ ः** सेवांतर्गत प्रशिक्षणाचा अर्थ केवळ सेवापूर्व शिक्षणातील उणिवा भरून काढणे यापेक्षा कितीतरी व्यापक असतो. सेवांतर्गत प्रशिक्षण म्हणजे अध्यापन क्षमतेचा सतत विकास मानवी विकास आणि मानवी जीवन या बद्दलची कायम जाणीव होय. सेवांतर्गत शिक्षणात इतरांबरोबर काम करण्याच्या क्षमतेचा अंतर्भाव आज केला पाहिजे. विविध वयोगटातील विद्यार्थी पालक सहकारी शिक्षक संस्था प्रमुख शासकीय अधिकारी व लोकाग्रणी अशा विविध घटकांच्या सहकार्याने विविध कार्यक्रम आज शिक्षकांना पार पाडावे लागतात. शिक्षकांनी सेवापूर्व प्रशिक्षणात लावलेल्या शिक्षणरूपी झाडाचा विकास सेवांतर्गत शिक्षणात होऊ शकतो. शिक्षण ही एक आयुष्यभर चालणारी गतिशील व सदैव परिवर्तनशील प्रकिया आहे. व्यक्ति निरंतर शिकू शकते. अमेरिकन शिक्षक म्हणतात “ शिक्षणाच्या निरंतर शिक्षणाचा अर्थ त्यांच्यातील उणिवांना दूर करणे होय.”

शिक्षकी पेशात प्रवेश करून त्यांच्या व्यवसायाची १२ वर्षे पूर्ण झाल्यावर त्याला ते प्रशिक्षण दिले जाते. त्याला सेवांतर्गत प्रशिक्षण असे म्हणतात.

सेवेत असणा या शिक्षकाला नवनवीन तंत्र अध्यापन पध्दती नवीन विचार याविषयी ज्ञान अद्ययावत करण्यासाठी जे प्रशिक्षण वर्ग घेतले जातात. त्याला ‘सेवांतर्गत प्रशिक्षण’ असे म्हणतात.

सतत ज्ञानदान करणाराने सतत ज्ञानग्रहण करणे गरजेचे ठरते. यासाठीचे सेवांतर्गत प्रशिक्षणाचे प्रयोजन केले जाते. याचे स्वरूप पुढीलप्रमाणे ः

**कार्ये ः**

१. समाजाकडे पाहण्याचा अनुकूल दृष्टिकोन विकसित करणे.
२. विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास करणे.
३. शिक्षण प्रशिक्षण महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे अध्यापन कौशल्य व अध्यापनक्षमता विकसित करणे.
४. संगणक कुशल असणे.
५. प्रशिक्षणासाठी स्वयंअध्ययन व्याख्याने चर्चा कृतिसत्रे प्रात्यक्षिक प्रकल्प इत्यादी पध्दतींचा वापर केला जातो.

६. सेवापूर्व प्रशिक्षणात शिक्षकाने सैध्दांतिक माहिती अथवा प्रात्यक्षिक कार्य पूर्ण केलेले असते हे गृहित धरूनच आणखी एक पाऊल पुढे टाकण्याचा प्रयत्न सेवांतर्गत प्रशिक्षणात केला जातो.

७. प्रशिक्षणाचा कालावधी मर्यादित असल्याने किमान उदबोधनाची व्यवस्था केलेली असून ज्ञान आकलनाची उद्दिष्ट पूर्ती करण्याचा प्रयत्न केला जातो. प्रशिक्षणानंतरचा कालावधी उपयोजन कौशल्य व वृत्ती या उद्दिष्टांसाठी गृहित धरलेले आहे. १० दिवसांच्या प्रशिक्षणाच्या १६० तासांचे नियोजन खालीलप्रमाणे केले जाते.

| | |
|---|---|
| प्रशिक्षणापूर्वीचा अभ्यास | २० तास |
| प्रशिक्षण कार्यक्रम | ५० तास |
| प्रशिक्षणानंतरचा गृहपाठ | ९० तास |

८. प्रशिक्षणासाठीचा अध्यापक वर्ग हा शिक्षणशास्त्र विद्यालय व महाविद्यालयातील प्राध्यापक २. कला विज्ञान कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक ३. ज्येष्ठ व अनुभवी माध्यमिक शिक्षक या तीन गटातून निवडला जातो.

**गरज व आवश्यकता**

१. बदलत्या परिस्थितीशी समायोजन साधण्यासाठी
२. ज्ञान व विज्ञानाच्या विकासासाठी
३. शिक्षण व्यवसायाची वृध्दी करण्यासाठी
४. नवीन शिक्षणसंरचना करण्यासाठी
५. आजन्म शिक्षणासाठी
६. विषयाच्या ज्ञानात प्रचंड वाढ
७. व्यक्तिगत पातळीवर ज्ञानग्रहण करणे अशक्य
८. वर्तन बदलात समायोजन साधण्यासाठी
९. शिक्षण संरचना तयार करण्यासाठी १० २ ३ माहिती अभ्यासक्रम बदल बदललेली संरचना बदलण्यासाठी
१०. आपल्या व्यवसाय प्रभावीपणे आणि गुणवत्तापूर्णरित्या करता येण्यासाठी सेवांतर्गत प्रशिक्षणाची गरज असते.

**उद्दिष्टे ः**

१. शाळेतील शिक्षकांची अखंड व्यावसायिक उन्नती करणे.
२. शिक्षकांना नवीन शोध तंत्राची माहिती करून देणे.
३. व्यवसायासंबंधी विचारविमर्श करणे.
४. व्यक्तिगत अनुभव आत्मविकासाची संधी प्राप्त करून देणे.
५. नवीन अभ्यासक्रमाशी संबंध प्रस्थापित करणे.
६. शिक्षकांच्या दूषित पार्श्वभूमीचा शेवट करणे.
७. शिक्षणासंबंधित समस्यांवर उपाय शोधणे.
८. कृतिसंशोधन प्रेरणा व प्रशिक्षण
९. आनंददायी शिक्षण चळवळीचा कार्याचा परिचय
१०. शिक्षण आत्मविश्वास साधने अनुभव संधी देण्यासाठी
११. माध्यमांचा वापर
१२. विषय संघटनेच्या चळवळीचा कार्याचा परिचय

**फायदे ः**

१. शिक्षकांची सर्जनशीलता विकसित करून त्यांना नवोपक्रम करण्यासाठी मार्गदर्शन करणे कृतिसंशोधनासंबंधी सखोल ज्ञान देणे.
२. आपली अभिरूची विकसित करणे तिला दिशा देणे. चांगली वृत्ती वा दृष्टिकोनांची निर्मिती करून जीवनविषयक ज्ञान विकसित करण्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन देणे.
३. शिक्षकांना नव्या व आधुनिक शैक्षणिक विचारप्रवहांची ओळख करून देणे व त्याचा अभ्यास करण्यास प्रवृत्त करणे. उदा. आपत्ती व्यवस्थापन अनुदेशन प्रणाली
४. आपल्या अध्यापन विषयाच्या ज्ञानाची ओळख व विषयज्ञान अभिवृध्दी होण्यासाठी मार्गदर्शन करणे संदर्भस्त्रोत व संदर्भ साहित्याची माहिती देणे. स्वयं अध्ययनाची प्रेरणा देणे.

५ . नवनव्या व प्रगत अध्ययन अध्यापन पध्दतीचा शिक्षकाला परिचय करून देणे या पध्दती समजावण्यास मदत करणे . ज्ञान व प्रेरणा देणे . उदा . प्रतिमानावर आधारित अध्यापन .

६ . आपल्या अध्यापन विषयाच्या ज्ञानाची ओळख व विषयज्ञान अभिवृध्दी होण्यासाठी मार्गदर्शन करणे कृती संशोधनासंबंधी सखोल ज्ञान देणे .

७ . स्वतःच्या व्यावसायिक पात्रतेबरोबरच सामाजिक आर्थिक पात्रता व प्रतिष्ठा वाढविण्यासाठी मदत करणे .

८ . विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाबरोबर स्वतःच्या व्यक्तिमत्त्व विकास करण्याची गरज आहे ही गोष्ट शिक्षकांना पटवून देणे व साध्य करण्यासाठी प्रवृत्त करणे .

९ . सेवापूर्व शिक्षक प्रशिक्षणातील त्रुटी दूर करण्यास सहाय्य करणे .

**निष्कर्ष :**

१ . सेवांतर्गत शिक्षक प्रशिक्षणामुळे भविष्यातील शिक्षकांना अध्यापन कौशल्य विकसित करण्यास सहाय्य ठरेल .

२ . सेवांतर्गत शिक्षक प्रशिक्षणामुळे तंत्रज्ञान या विषयासंबंधी ज्ञान वाढविण्यास उपयुक्त ठरते .

३ . ज्ञान व विज्ञानाच्या विकासासाठी सेवांतर्गत प्रशिक्षण उपयुक्त ठरेल .

४ . शिक्षण क्षेत्रातील नवीन ज्ञान आत्मसात करण्यासाठी भविष्यकाळात शिक्षक प्रशिक्षक हे अधिक उपयुक्त माध्यम ठरेल .

५ . शिक्षक व्यवसायातील शिक्षकांचा वैयक्तिक प्रभाव वाढविण्यासाठी सेवांतर्गत शिक्षक प्रशिक्षण उपयुक्त ठरते .

**संदर्भ ग्रंथ**

*डॉ . सौ . स्नेहलता तावडे प्रा . प्रतिभा रा . शिंदे माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण व्यवस्थापन समस्या व उपाय डायमंड पब्लिकेशन्स पुणे १ २००५*

*डॉ . सौ . किरण भागतोडे शालेय व्यवस्थापन शैक्षणिक संरचना आणि आधुनिक विचारप्रवाह विद्या प्रकाशन नागपूर २००६*

*डॉ . एम . एल . जाधव प्रा . आर . आर . माने शालेय व्यवस्थापन फडके प्रकाशन कोल्हापूर २००८*